# प्रकाशतत्त्व

~ गुरुमाई चिद्विलासानंद

दीपावलीचा उत्सव म्हटला की, मनात लगेच येतात त्या म्हणजे
मनोहर दीपज्योतींच्या रांगाच रांगा
ज्या प्रत्येक मार्ग सुशोभित करतात,
प्रत्येक ओसरी-पडवी,
प्रत्येक उंबरठा
आणि अर्थातच, श्रद्धाळू भक्तांकरिता
प्रत्येक पूजावेदी सुशोभित करतात
छोटे दिवे,
मोठे दिवे,
इवल्याशा ज्योती,
नृत्य करणाऱ्या ज्योती—
महत्त्व आकाराला नसते
कारण हे सारे *प्रकाशाचे* द्योतक आहेत.

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

या क्षेत्रातील काही तज्ज्ञांनी म्हटले आहे की
सुमारे १.५ ते २ दशलक्ष वर्षांपूर्वी
मानवाला हे समजू लागले की, अग्नी काय आहे—
आणि त्यामुळे त्याची जगण्याची पद्धतच बदलली
मी विचार करते की
त्या क्षणाचा साक्षी होणे कसे असेल जेव्हा

मानवाने अग्नीचा प्रकाश प्रथमच पाहिला असेल,
प्रथमच त्याची ऊब अनुभवली असेल
आणि हे तत्त्व काय आहे वा काय असू शकते याविषयीच्या
पुसटशा संभावनेचा किरण
त्याच्या मनात चमकून गेला असेल
या ग्रहावर अग्नीचा शोध लागणे,
अग्नी उपयोगात आणण्याकरिता
आपल्या जन्मजात बुद्धिमत्तेचा वापर करणे
यामध्ये मानवाकरिता निश्चितच काहीतरी खास होते
त्यामुळे त्याच्या विचारसरणीला नवा आकार मिळाला,
त्याच्या ज्ञानक्षेत्राची व्याप्ती वाढली,
दैनंदिन जीवनाची कार्ये करण्याच्या
त्याच्या पद्धतीत बदल झाला
प्रकाशावर लक्ष केंद्रित करून जगणे,
प्रकाशाच्या भावासह जगणे

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

याला *अग्नी* म्हणा, *ज्योती* म्हणा, *दीप* म्हणा,
याला *फुएगो, फोया, शम्मा, फ्यिाम्मा* म्हणा,
याला *आगोन, पुलूम्यै, हॉयेन, होनोओ* म्हणा,
याला *आतिश* म्हणा, *ओगिन* म्हणा, *फ्लाम्म* म्हणा—
अग्नीचे वर्णन करण्याकरिता, ज्योती दर्शविण्याकरिता,
तुम्ही कोणत्याही शब्दांचा प्रयोग केला तरी
या तेजाचे सारतत्त्व
बदलत नाही

तुम्ही तुमच्या इच्छेनुसार, तुम्हाला हव्या त्या प्रकारे,
प्रकाशाला शोधण्याची आणि त्याला प्रकट करण्याची
निवड जेव्हा कराल, तेव्हा
त्यामुळे तुमच्या उत्सवाला झळाळी येईल,
त्यामुळे तुमची पूजावेदी झगमगू लागेल,
त्यामुळे तिमिर दूर होईल,
त्यामुळे तुमच्या प्रार्थना फलद्रूप होतील
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा
केंद्रबिंदू आहे,
मध्यबिंदू आहे,
मूलभूत सत्य आहे
एका स्मितहास्याचा प्रकाश
एका शब्दाचा प्रकाश
एका विचाराचा प्रकाश
तुमच्या श्वासाचा प्रकाश
गरजूंना दिलेल्या एका उपहाराचा प्रकाश
आजारी किंवा दुःखग्रस्त असलेल्यांना
देऊ केलेल्या वेदनाशमनाचा प्रकाश
बोधाचा प्रकाश जो मानवजातीचे उत्थान करतो
तो प्रकाश ज्यातून आपली उत्पत्ती होते
आणि ज्यामध्ये आपला लय होतो
तो प्रकाश जो
कणाकणात, समस्त वस्तुमात्रामध्ये
स्पंदित होतो
*ऑर एलोहिम: ईश्वराचा प्रकाश:*
*नूर 'इलाही: खुदाचा प्रकाश:*

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

या प्रकाशाच्या शक्तीवर
सहस्रावधी काव्यरचना केल्या गेल्या आहेत
कितीतरी कथा या प्रकाशाच्या शोधाचे चित्रण करतात
अनेक संस्कृतींमध्ये, परंपरांमध्ये आणि कालखंडांमध्ये
याविषयीचे आकर्षण आजही कायम आहे—
*प्रकाश, प्रकाश,*
एका दीर्घ, काळोख्या रात्रीनंतर अरुणोदयाचे अभिवचन,
श्यामनीलवर्णी भुरकट आकाशामध्ये
उज्ज्वल प्रभेची उधळण करत
प्रस्फुटित होणारा सूर्यनारायण
खरे सांगायचे झाले, तर दीपावली साजरी करण्याची
निखळ आतुरता ही
काळाच्या ओघासमवेत अत्यंत वेगाने वृद्धिंगत होत जाते
भरपूर कल्पना सुचतात,
आविष्कारशील, आनंदमस्तीने भारून टाकणाऱ्या कल्पना,
दीपावलीच्या आनंदसोहळ्यामध्ये, हिच्या उल्लासामध्ये
सगळ्यांना सहभागी करून घेण्याच्या
अदम्य प्रेरणेसमान
केवळ उत्कंठेचा अंतराग्नीच असू शकतो
ही अशी वेळ असते जेव्हा लोकांमध्ये ही तळमळ असते की,
त्यांनी अधिक चांगले मनुष्य बनावे,
भूतकाळात दुखावल्यामुळे झालेल्या वेदना सोडून द्याव्यात
आणि नव्याने सुरुवात करावी,

एक असे जीवन जगावे की जे
‘सच्चिदानंदा’च्या—
सत्,
चित्,
आनंदाच्या
ज्ञानयुक्त बोधाने चमचमते

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

प्रकाशाविषयी असे काहीतरी आहे जे मनाला मोहून टाकणारे आहे—
याने केवळ अग्नीचाच भाव जागृत होतो असे नाही,
किंवा ज्वलंततेचा भाव असलेल्या संज्ञांनीच याला
नेहमी परिभाषित केले जाते असे नाही
असंख्य उपमांतून आणि रूपकांतून,
जलतत्त्वाचा प्रयोग करून प्रकाशाचे वर्णन केले जाते :
पर्वत प्रकाशाने *न्हाऊन निघाला* आहे
रमणीय भूप्रदेश प्रकाशात *चिंब झाला* आहे
प्रभातीचे आकाश प्रकाशाच्या तेजाने *सिक्त झाले* आहे
ध्यानाच्या स्थानी प्रकाशकिरणांचा *वर्षाव झाला* आहे
रानवाटेवर प्रकाशाचा *पूर लोटला* आहे
पावसाचे थेंब प्रकाशात *चकाकत* आहेत
प्रकाशाचे *तरंग उठत* आहेत
आकाशातून प्रकाशाचा *झरा वाहतो* आहे
प्रकाश तुमच्या अस्तित्वात *प्रवाहित होतो* आहे
सिद्धयोगाचे अभ्यास आपल्यावर स्वरमधुर प्रकाशाचा वर्षाव करतात
प्रकाशसरिता या ब्रह्मांडाच्या प्रत्येक कोशिकेतून वाहते

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

दीपावलीप्रीत्यर्थ तुम्ही जेव्हा दीप प्रज्वलित कराल
तेव्हा अशी कल्पना करण्याचे स्मरणात ठेवा की
तुमच्या हृदयातील प्रेमाची ऊब कशा प्रकारे चहुदिशांना
चांगुलपणा प्रसारित करते आहे
तुम्ही जेव्हा आपापल्या पद्धतीने
एखाद्याला मंगल कामना देण्याकरिता “शुभ दीपावली” म्हणाल
तेव्हा हे जाणा की तुमचे सहृदयतापूर्ण, मधुर हास्य
त्यांना प्रसन्न करेल
तुम्ही जेव्हा नैराश्य सोडून देण्याचा निर्धार कराल
आणि ती प्रत्येक गोष्ट सोडून देण्याचा निर्धार कराल
जी तुम्हाला तुमचा स्वतःचा प्रकाश ओळखण्यापासून
रोखून ठेवते, तेव्हा तुम्ही असे अनुभवाल की,
तुमचा आत्मविश्वास आपसूकच स्वतःची
पुनर्निर्मिती करतो आहे

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

तुमच्या जीवनात घडणाऱ्या आणि न घडणाऱ्या सर्व प्रसंगांदरम्यान
तुम्हाला प्रशांतीची अनुभूती होवो
तुम्ही सदैव मैत्रीभावाच्या प्रकाशाने वेढलेले राहावे
तुमच्या आंतरिक प्रकाशाच्या सामर्थ्याद्वारे तुम्ही सदैव संरक्षित राहावे

ज्या लोकांना तुमच्या सहवासात आनंद वाटतो
त्यांच्याकडून तुम्हाला सदैव प्रशंसा मिळत राहो
सुस्पष्टतेचा प्रकाश तुमच्या जीवनात प्रखरतेने चमकत राहो
अचूकपणाचा, नेमकेपणाचा प्रकाश तुमच्या यात्रेत तुमचे मार्गदर्शन
अगदी त्याचप्रमाणे करो
जसे वृक्षांच्या मधून हळुवारपणे येणारी मृदुल रविकिरणे
भगवंताच्या तारक प्रकाशाने तुम्हाला
प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक रात्री धन्यता वाटत राहो

महत्त्व असते प्रकाशतत्त्वाला
प्रकाश हा दीपावली उत्सवाचा केंद्रबिंदू आहे

सप्रेम,
गुरुमाई चिद्विलासानंद

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.